जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०८/२०२३
## दि.०६/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६४०/२०२३,भादविक ३०७,३२३,३२४,५०४,५०६(२),३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २३ वर्षे,रा.गायरान वस्ती,वाघोली,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | विनोद सुनिल पाथरे,वय-२३ वर्षे,रा.गायरान वस्ती,वाघोली,ता.हवेली,जि.पुणे २.अमर सुनिल पाथरे,वय-२० वर्षे,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०८/२०२३ रोजी २२/३० वा.पेट्रोल पंपाचे मागे,पाटील वस्ती,ता.हवेली,जि.पुणे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरा समोरील अंगणात त्यांचे पती गजानन भीमराव वानखेडे,वय-३५ वर्षे यांनी त्यांचे शेजारी राहणारे नमुद इसम यांना त्यांचे घराचे बांधकाम करण्यासाठी फिर्यादी यांचे पती यांनी त्यांचे घरातील लाकडी शिडी भाडेतत्त्वार दिली होती. ती शिडी कधी परत करणार व त्यांचे ठरल्याप्रमाणे भाडे कधी देणार,याबाबत विचारणा केल्याचा राग मनात धरून,सदर इसमांनी आपसात संगनमत करून,गजानन वानखेडे यांना शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन दमदाटी केली. तसेच त्यांचे घरातील धारधार शस्त्राने फिर्यादी यांचे पती गजानन वानखेडे यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचे डोक्यात वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच फिर्यादी हया त्यांचे पतीला वाचवित असताना,फिर्यादी यांना अडवणुक करून,त्यांचे उजव्या हातावर वार करुन दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.वाय.राजगुरू ८८८८६१८४०० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५१२/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मो.वा.का.११९/१७७, १३२(१)(क) |
| **फिर्यादी** | राजेंद्र लाहोटी,वय-६२ वर्षे,रा.टिळेकरनगर,कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | कंटेनर ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०२३ रोजी ११/३० वा.पॅरामाऊंट गार्डन समोर,शिवशंभोनगर गल्ली नं.४,कात्रज-कोंढवा रोड,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा आदित्य राजेंद्र लाहोटी वय-२८ वर्षे,रा.बी/३,४०२,अपटाऊन कंट्री वुड्स,टिळेकरनगर,कोंढवा,पुणे हा त्याचे मोटार सायकलवरून त्याचे राहते घरी येत असताना, यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कंटेनर ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार आदित्य राजेंद्र लाहोटी,वय-२८ वर्षे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन देशमुख ९७६५३९०९४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १११५/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.भेकराईनगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०८/२०२३ रोजी गाडीतळ पी.एम.पी.एल. बस डेपो हडपसर येथुन बस मध्ये चढल्यावर मगरपट्टा चौक येथील ब्रिजचे प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया गाडीतळ मनपा पीएमपीएमएल बस डेपो,हडपसर ते मगरपट्टा चौक येथील ब्रिज असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील मोठया पर्स मधुन छोटया पर्स मधील सोन्याचे दागिने १,२०,०००/- रुपये किमतीचे छोटया पर्ससह चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कारंडे ७८७५०४८४६६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**